UPISE-CODE- 27251501117

कायम विनाअनुदान तत्वावर.

~~विनाअनुदान तत्वावर.~~

जा. क्र. प्रा/प्राशि/खाप्राशा/मान्यता/पुवि/
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय.
दिनांक :- 2 9 MAR 2000

प्रति,

~~शिक्षणाधिकारी (प्राथमिक),~~
~~जिल्हा परिषद,~~
शिक्षण प्रमुख/प्रशासन अधिकारी,
न.पा. /न.पा. शिक्षण मंडळ, जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे-५.

विषय :- सन १९९९-2000 या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत. [माध्यम - इंग्रजी ]

संदर्भ :- शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक-व्हीएलएस/१०९८/(१२७)प्राशि-३ दिनांक - ८ जून, १९९९

उपरोक्त विषयासंबंधीने आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकन करावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून, १९९९ पासून इयत्ता १ ली च्या फक्त/~~प्रत्येकी~~ एका तुकडीस सन १९९९-2000 या शैक्षणिक वर्षात ~~प्रत्येक सुरु असलेल्या प्राथमिक~~ शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर ~~विनाअनुदान तत्वावर~~ / कायम विनाअनुदान तत्वावर "खास बाब" म्हणून परवानगी देण्यात येत आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटींवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव. | शाळेचे नांव व ठिकाण. | इयत्ता. | माध्यम. |
|---|---|---|---|---|
| १. | इंद्रायणी संस्था, वडगाव मावळ, पुणे. | श्री साई प्रायमरी स्कूल, वडगाव मावळ, पुणे. | इ. १लीची फक्त एक तुकडी. | इंग्रजी |

२.१ सदर संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

२.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असली पाहिजे.

२.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद व शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवा शर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

२.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापन, विषयक सुविधा शाळा व्यवस्थित चालविण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

२.५ संस्थेने या शाळेसाठी शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मूल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम व उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वित केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

२.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विविध नोंदवह्या अद्ययावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

२.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये नियमित शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशीरपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबविणे आवश्यक आहे.

२.८ संस्थेने परवानगीसाठी निश्चित केलेले माध्यम, शाळेची जागा इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

२.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

२.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देताना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

२.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

२.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नुतनीकरणासाठी अर्ज सक्षम क्षेत्रीय अधिका-यांकडे [परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे] करणे बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

— — — — — — — — — — — — — — — — — — — — — —

सदर परवानगी पत्र प्राप्त झाल्या नंतर सक्षम प्राधिका-याने ही परवानगी संबंधित शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनाच्या निदर्शनास तात्काळ आणावी. सदरची बाब संस्थेच्या निदर्शनास आणल्यानंतर संस्थेने परवानगी मिळालेल्या माध्यमातून व ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु करणे आवश्यक आहे. अशा संस्थेने तद्नंतर सक्षम प्राधिका-याकडे [आपणांकडे] नवीन प्राथमिक शाळा मान्यतेसाठी अर्ज करावा, असा अर्ज मिळाल्यानंतर सक्षम प्राधिका-याने शाळेची तपासणी करुन तपासणी अहवाल शिक्षण मंडळ/शिक्षण समिती यांचेकडे मान्यतेसाठी सादर करावा व शाळेच्या मान्यतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. शिक्षण मंडळ/शिक्षण समिती ची मान्यता मिळताच त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

स्वाक्षरीत/- [illegible] उ. बी.
[illegible]

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१. करिता

प्रत :- माहितीस्तव सविनय सादर.

१] मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन,
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.

२] मा. शिक्षण संचालक,
शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

३] शिक्षणाधिकारी [प्राथमिक],
जिल्हा परिषद, पुणे.

४] मा. सचिव/अध्यक्ष,
[illegible], पुणे-१५. ..........

......................................

......................................

इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांना परवानगी दे

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय, क्र.नमाशा २००९ /(७१७/०९)/माशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २४ ऑगस्ट २००९.

शासन निर्णय :-

शासन परिपत्रक, दि. २९ एप्रिल २००८ अन्वये राज्यात कायम विनाअनुदान तत्वा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्याकरिता खाज संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्या अनुषंगाने सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर ि समितीच्या शिफारशी शासनास प्राप्त झालेल्या आहेत. यापैकी इंग्रजी माध्यमाच्या माध्यमि करण्यासंदर्भात प्राप्त प्रस्तावांपैकी ज्या प्रस्तावांवर जिल्हा अथवा राज्य समिती, यापैकी को समितीची शिफारस आहे अशा शाळांना सन २००९-१० पासून या शाळांमध्ये सुरु असलेल्या सर्व विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात येत आहे.

२. कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या या शाळांना कोणत्याही स्वरु शासनाकडून देय असणार नाही.

३. शासन निर्णय, दि. १९ ऑक्टोबर २००७ मधील तरतुदीनुसार सदर शासन निर्णयान्व देण्यात आलेल्या शाळा अठरा महिन्यांच्याआत सुरु होणे बंधनकारक राहील. अन्यथा या शाळे आदेश रद्द झाले आहेत असे गृहित धरले जाईल.

४. कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या सहपत्रात नमूद सर्व शाळांना शा संबंधित नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

५. कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या सहपत्रात नमूद सर्व शाळांना मा संहितेमधील तरतुदीनुसार प्रथम मान्यतेकरिता संबंधित विभागीय उपसंचालक कार्यालयाकड आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharashtra.gov. असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २००९०८२४१४०९१३००९ असा आ

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(स्वाक्षरी)

( डॉ. सुवर्णा सि. खरात )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषदा
सर्व शिक्षण निरीक्षक(पश्चिम/उत्तर/दक्षिण), बृहन्मुंबई
मा.मंत्री (शालेय शिक्षण)यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
मा. सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा) यांचे स्वीय सहायक.
शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील कार्यासन अधिकारी-प्राशि-३/उमाशि-१/माशि-२
निवड नस्ती माशि-१

F:\rekha\GR\Eng medium- 1committee-4809

PRINCIPAL
S. S. ENGLISH MEDIUM SCHOOL

S. S. Eng. Med. School, Reg. No. नमाशा/२००९/(७१७/२००९) माशि-१, Shanwadi, Yerwada

| अ. क्र. | प्रस्ताव क्रमांक | संस्थेचे नाव | शाळेचे नांव व ठिकाण | माध्यम |
|---|---|---|---|---|
| ७ | २ | इंद्रायणी संस्था देवकरबाग स.नं.४ कळस माळवाडी पुणे १५ | एस.एस. इंग्लिश मिडीयम स्कूल, स.नं.११६ येरवडा पुणे ६ | इंग्रजी |
| | | | इंग्रजी माध्यमिक प्राथमिक शाळा पुणे. | इंग्रजी |
| ८ | ३ | महाराष्ट्र गर्ल्स एज्युकेशन सोसा.हुजुरपागा पुणे ३० | | |
| ९ | ४ | वसुंधरा इन्स्टि. ऑफ एज्यु. सोशल वेलफेअर पुणे ४ | वसुंधरा सेकेंडरी स्कूल, एरंडवणा पुणे ४ | इंग्रजी |
| १० | ५ | कै.पै.हिरामण बनकर चॅरीटेबल ट्रस्ट सुखसागर नगर, कात्रज पुणे ४६ | एल.एस. जडाबाई इंग्लिश स्कूल, सुखसागर नगर पुणे ४६ | इंग्रजी |
| ११ | ६ | डेक्कन एज्युकेशन सोसायटी पुणे | न्यु. इंग्लिश मेडियम सेकंडरी स्कूल, टिळक रोड पुणे ३० | इंग्रजी |
| १२ | ७ | मार ग्रेगोरिअस मेमो. सेंटर ८ कळस पुणे १५ | एम.जी. एम. इंग्लिश स्कूल, आळंदी रोड, कळस पुणे ४११ ०१५. | इंग्रजी |
| १३ | ८ | श्रीनाथ शि.प्र.मंडळ कोंढापुरी तळेगाव ढमढेरे जि.पुणे | माध्यमिक शाळा इंग्रजी माध्यम, कोंढापुरी तळेगाव ढम. ता.शिरुर | इंग्रजी |
| १४ | १० | पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, एरंडवणा पौड रोड पुणे ३८ | इंग्लिश मिडीयम सेकंडरी स्कुल, खराडी पुणे १४ | इंग्रजी |
| १५ | १२ | सेंट जॉर्ज बालिकाग्राम आकुर्डी देहूरोड पुणे | सेंट जॉर्ज इंग्लिश स्कूल, मामुर्डी देहूरोड, पुणे ४१२१०१. | इंग्रजी |
| १६ | १४ | लोकसेवा प्रतिष्ठान मंगळवार पेठ पुणे | लोकसेवा मुलींचे इंग्रजी माध्यमिक शाळा, फुलगाव ता.हवेली | इंग्रजी |
| १७ | १५ | सुभद्रा एज्यु.सोसा.महाराष्ट्र हौ.बोर्ड येरवडा पुणे ६ | एस.एन.बी.पी. स्कूल, स.न. २९/२/२९ पी ३० व ३१, रहाटणी ता.हवेली, जिल्हा पुणे. | इंग्रजी |
| | | | [illegible] पिंपळेनगर | इंग्रजी |

S. S. Eng. Med. School Reg. No. नमाशा/२००१/(७१७/२००१) माशि-१ Shastrinagar? Yerwada

PRINCIPAL
S. S. ENGLISH MEDIUM SCHOOL